# रे जीवना

रे जीवना...
तुझ्याकडे बघतांना दिसतात
सुखदु:खाच्या पाऊलवाटा
त्या वाटेवर दिसतात
पुसट झालेल्या सुखाच्या खुणा
अन् उमटलेले दिसतात
दु:खाचे ठसे .....

रे जीवना ...
तुझ्यातच दिसतो
आशा निराशेचा मेळ
निराशेवर करूनी मात
आशेच्या पटावर
मांडायचा असतो
रोज नवा खेळ .....



रे जीवना ...
तुझ्यातच दिसतं
आकांक्षाचं आकाश
पराक्रमाच्या तेजाने
ज्ञानाचे पंख पसरून
घ्यावी भरारी, शोधण्या
नवा प्रकाश .....

रे जीवना ...
तुझ्यातच दिसतात
खुणावणारी नवी क्षितीजे
अनुभवातून मिळतात
जगण्याच्या कळा
अविट ही तुझी रे गोडी
जसा अमृताचा प्याला !! .....

प्रीती सगदेव
मोबा: ९८२२०३२०१८